## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ०१३
दूरध्वनी - ०२२-२४३२२६८०८/८१२ ई मेल – mlwbcivil@gmail.com

---

जा.क्र.मका/बांधकाम/२०२२/१६३ दिनांक : ०७/०७/२०२२

### जाहीर प्रगटन

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नवीन इमारतीतील
उदवाहन क्र.१ च्या देखभाल दुरुस्ती ठेक्यासाठी दरपत्रक सादर करणेबाबत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय (प्रशासकीय इमारत), प्रभादेवी, मुंबई - येथील इमारतीच्या उदवाहन क्र.१ च्या देखभाल दुरुस्ती कामासाठी खालील अटी व शर्तीनुसार नोंदणीकृत ठेकेदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या उपरोक्त नमूद ठिकाणी कार्यरत असलेल्या उदवाहन क्र.१ च्या देखभाल दुरुस्ती कामासाठी बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२) कामाचा कालावधी १ ऑगस्ट २०२२ ते ३१ जुलै २०२३ असेल. ठेकेदारास दोन टप्प्यात देयक अदा केले जाईल. पहिल्या टप्प्यातील देयक फेब्रुवारी २०२२ मध्ये आणि दुसऱ्या टप्प्यातील देयक ऑगस्ट २०२३ मध्ये अदा केले जाईल.

३) दरपत्रके सादर करण्यापुर्वी संबंधित ठेकेदारांनी उदवाहनाची प्रत्यक्ष पाहणी करुन घ्यावी त्यानंतरच दरपत्रक सादर करावेत. दरपत्रकात सर्व करांसहित रक्कम नमूद करावी.

४) उपरोक्त नमूद कार्यालयीन पत्यावर दि.२२/०७/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत दरपत्रक सादर करावेत. प्राप्त दरपत्रके शक्य झाल्यास दि.२२/०७/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील.

५) शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन निर्णय / परिपत्रके / मार्गदर्शक सूचना / अध्यादेश याच्या अधीन राहून उदवाहन देखभाल दुरुस्तीचे काम करणे ठेकेदारास बंधनकारक असेल.

६) संबंधित शासकीय प्राधिकारणाकडून उदवाहनाचे प्रमाणपत्र नूतनीकरण करणे व इतर आवश्यक मान्यता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल. तसेच संदर्भीय पत्रात नमूद नियम अटी ठेकेदारास बंधनकारक असतील.

७) दर महिन्याला पहिल्या आठवड्यात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी लिफ्टची नियमित देखभाल दुरुस्तीची कामे करणे बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त मंडळाच्या निर्देशानुसार आवश्यक तेव्हा उद्‌वाहनाची देखभाल दुरुस्ती ठेकेदारास करावी लागेल. देखभाल दुरुस्ती कामे करतांना बांधकाम शाखेस तोंडी पूर्वकल्पना देण्यात यावी.

८) सदर वार्षिक देखभाल दुरुस्ती ठेका Semi Comprehensive असून लिफ्टच्या नियमित देखभाल दुरुस्तीसह पुढील नमूद पार्ट्स विनाशुल्क बदलून देण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

- Control Small Parts (Phase reversal unit, overload, ply relay etc)
- Floor Relays.
- Lock Contact (Not a Completing Lock)
- Car Operating Panel Parts (Not a complete panel board)
- Landing Buttons (Not a complete box)
- Floor Switches
- Speed Governor Roller
- Break Liners

९) वार्षिक देखभाल दुरुस्ती ठेक्यात पुढील पार्ट्सचा समावेश नसेल.

- Motor & Machine Complete
- Main Rope & Safety Rope
- Landing Automatic Doors
- Cabin & Car Door with operator
- Car & Landing Seal
- Door Drive & Door Motor
- Car Door Belt
- Control Main Card & Rectifier Card
- Break Coil
- Transformers
- Travelling Cable & 3 Phase Cables
- Logic Board & Power Supply Card
- ELCB & Main Switch
- Fan & Tube Light
- V3F Drive

१०) मुद्दा क्र.९ मध्ये नमूद पार्ट्स खराब झाल्यास ठेकेदाराने त्याबाबत अपेक्षित खर्चासह लेखी कळवावे व मंडळाच्या पूर्वसंमतीने सदर साहित्याची ठेकेदाराने करणे आवश्यक असेल. सदर पार्ट्सच्या खर्चाची प्रतीपूर्ती

मंडळातर्फे ठेकेदारास करण्यात येईल. तथापी, पार्ट्स बदलण्यासाठी कोणतीही अतिरिक्त मजुरी दिली जाणार नाही.

११) देखभाल दुरुस्ती करतांनाचे आणि खराब साहित्य बदलतांना दुरुस्तीपुर्वी व दुरुस्ती नंतरचे फोटो देयकासोबत सादर करावेत.

१२) कार्यादेशात नमूद अटी व शर्ती ठेकादारास मान्य असल्याबाबत रु.१०० च्या स्टँप पेपरवर हमीपत्र सादर करावे.

१३) कामाचा दर्जा समाधानकारक न आढळल्यास कामाचा ठेका रद्द करण्याचा अधिकार मंडळास असेल.

१४)उपरोक्त दरपत्रके स्विकारणे, तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता दरपत्रक नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार मा.कल्याण आयुक्त यांना राहील.

(रविराज इळवे)

कल्याण आयुक्त